
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 3 | DECEMBER - 2023

# संघर्षाची यशोगाथा – ‘ हे ही दिवस जातीलच ’ (आत्मचरित्र) डॉ उद्धव भाले

डॉ. दयानंद लिबाजी भोवाळ
मराठी विभाग प्रमुख , कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग
ता. तुळजापूर जि. धाराशिव.

## प्रस्तावना




मानवी जीवनामध्ये साहित्य , समाज , संस्कृती आणि वैचारिक बौद्धिक जाणीव ही अत्यंत महत्त्वाची आहेत वैचारिक क्रांतीतून समाज जीवनात क्रांती होत असते, त्याचे प्रतिबिंब साहित्यातून अभिव्यक्त होत असते . भारतीय समाज जीवन हजारो वर्षापासून उपेक्षित , वंचित आणि गुलामगिरीत जीवन जगणाऱ्या दलित समाजाला माणूस म्हणून जीवन जगण्याची जाणीव करून देणारे महामानव बोधिसत्व, भारतीय संविधानाचे शिल्पकार , विश्वरत्न , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि अतुलनीय स्वरूपाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक क्रांतीतून दलित समाजाचे जडणघडण झाली आहे , तसेच भारतीय समाजामध्ये वैचारिक, बौद्धिक क्रांती झाली आहे. हे आजच्या विज्ञानवादी ही युगात महत्त्वाचे आहे.

जागतिक क्रांतीचे विचारवंत तत्त्वज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या वैचारिक क्रांतीतून दलित साहित्याची निर्मिती झाली आहे. म्हणून दलित साहित्याचे प्रेरणास्थान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत , ‘शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा ’ या मूलतत्त्वाच्या प्रभावातून दलित समाजाची आणि दलित साहित्याची जडणघडण झाली आहे. ,त्यामुळे हजारो वर्षापासून अंधारामध्ये खिचपत पडलेल्या समाजाला प्रकाशमान आणि ज्ञानवंत करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणातून प्राप्त झाले आहे.

## मराठी दलित साहित्य स्वरूप आणि महत्त्व :-

भारतीय साहित्याच्या विश्वामध्ये मराठी दलित साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण भारतीय दलित साहित्याची निर्मिती ही , मराठी दलित साहित्यातून झाली आहे. हे आपल्याला नाकारता येत नाही. त्यामुळे मराठी दलित साहित्यिकांचे त्यांच्या साहित्य निर्मितीतील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. मराठी दलित साहित्य हे भारतीय दलित साहित्याची जननी आहे असे म्हटले तरी वावगे किंवा अतिशयोक्ती ठरणार नाही. मराठी दलित साहित्यकांनी कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र आणि वैचारिक लेखन केलेले आहेत . त्यामध्ये दलित आत्मचरित्र हा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार मराठी साहित्यात निर्माण झाला आहे. दलित साहित्यतून व्यथा, वेदना, विद्रोह आणि नकार या चार तत्व प्रणालीची अभिव्यक्ती झालेली आहे. म्हणून दलित साहित्याला विद्रोही साहित्य आणि आंबेडकरवादी साहित्य म्हणून संबोधले गेले आहे

**दलित आत्मचरित्र :-**

मराठी दलित साहित्यक मंडळींनी आपले स्वजीवन , स्वनुभव दलित आत्मचरित्रातून अत्यंत परखंडपणे व वास्तववादी भूमिकेतून व्यक्त केलेली दिसून येते. ' जे जगल ते भोगाले' ते अत्यंत संवेदनशील आत्म जाणिवातून दलित आत्मचरित्राची निर्मिती झाली आहे. म्हणून दलित आत्मचरित्र हे जरी व्यक्तीनिष्ठ असेल तरी ते समाजनिष्ठा स्वरूपाचे आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही. दलित आत्मचरित्रातून अनेक प्रतिभावंतांचा व जीवनप्रवास कसा संघर्षमय स्वरूपाचा होतो. याची प्रचिती त्यांच्या चरित्राचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते

दया पवार यांचे 'बलुत ', प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीतील पक्षी', शरण कुमार निबाळे यांचे 'अकरमासी' असा अनेक दलित आत्मचरित्राचा उल्लेख करता येईल त्यांनी व्यक्तीमनाबरोबर समाज मनाचे चिंतन अत्यंत वास्तववादी भूमिकेतून व्यक्त केल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक क्रांतीतून निर्माण झालेले नव्यापिढीतील उदयनमुखी दलित साहित्यिक व वनस्पतीशास्त्रातील संशोधक डॉ. उद्धव भाले यांचे 'हेही दिवस जातीलच' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वप्रणालीतून प्रेरणा घेऊन डॉ. उद्धव भाले यांनी आपल्या जीवनाचा मार्गक्रम कसा केला आहे . यांचे वास्तववादी विवेचन आत्मचरित्रातून अभिव्यक्त झाल्याचे दिसून येते.

**हे ही दिवस जातीलच: डॉ. उद्धव भाले :-**

डॉ. उद्धव भाले यांचे अभ्यासू व्यक्तिमत्वबरोबरच स्वाभिमानी, मनोवृत्ती, कर्तव्यनिष्ठा आणि विवेकवादी बौद्धिक दृष्टिकोन ठेवून त्यांनी संघर्षमय असा जीवनाचा मार्गक्रम कसे केले आहे. बालपणापासून ते कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथे वनस्पतीशास्त्र विभागात आधिव्याख्यात म्हणून रुजू होण्यापर्यंतचा कालखंड जवळजवळ २९ वर्षांचा जीवनप्रवास त्यांनी 'हेही दिवस जातीलच' या आत्मचरित्रातून व्यक्त केलेले आहेत. जीवन जगत असताना सहन करावा लागलेला संघर्ष, अनेक कठीण प्रसंग, दुःख, व्यथा, वेदना ही व्यक्त झालेल्या आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वप्रणालीच्या प्रभावातून जीवनाकडे सकारात्मकदृष्टीने व स्वाभिमानी मनोवृत्तीने जगण्याचा जाणीवा त्यांच्या आत्मचरित्रातून अधोरेखित झालेल्या आहेत.

**लेखक परिचय: डॉ उद्धव भाले :-**

डॉ उद्धव भाले यांचा जन्म १८ मार्च १९७४ मध्ये येवरी मंगरूळ ता. जळकोट जि. लातूर येथे झाला त्यांचे पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण जन्मगावी झाले आहे पाचवी ते आठवी पर्यंत शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवणखेड तालुका अहमदपूर येथे झाले आहे. आठवी ते दहावीपर्यंत सरस्वती विद्यामंदिर कुमठा (बु ) तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथे झाले आहे

अकरावी बारावी सायन्स यशवंत कनिष्ठ महाविद्यालय वाढवणा (बु ) तालुका उदगीर येथे झालेले आहे.B.Sc . शिवाजी महाविद्यालय उदगीर येथे झाले. M.Sc. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे झाले आहे तसेच B.Ed शासकीय महाविद्यालय नांदेड येथे पूर्ण केले अहे Ph.D. देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे झाले आहे.

डॉ. उद्धव भाले यांच्या शैक्षणिक वाटचाल अनंत प्रकारच्या संघर्षातून झाली आहे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथे २००३ मध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत झाले. त्यानंतर आपल्या जीवनाचा प्रवास नंतर सुखद आनंदी कसा झाला म्हणून त्यांनी 'हे ही दिवस जातीलच' या आत्मचरित्रातून आपल्या आत्मजाणीवा कोणत्याही जाती-धर्मातील तरुण भावी पिढीला प्रेरणादायी ठरतील असे मला प्रामाणिकपणे वाटते. आत्मचरित्र हे व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचे व वास्तव जीवनाची अभिव्यक्ती केली जाते त्याविषयी डॉ. सुरेश धायगुडे म्हणतात की, "व्यक्तीनिष्ठता हा अर्वाचीन साहित्याचा फार मोठा गुण आहे. प्रत्येक लेखकाला स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व असते म्हणून त्याचे साहित्य इतरांपेक्षा निराळा असते. त्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांच्या साहित्यावर अपरिहार्यपणे पडतोच" १. म्हणजेच कोणत्या साहित्यकृतीतील त्या साहित्यकृतीत व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब प्रतिनिधी झालेले असते. म्हणून उद्धव भाले यांच्या आत्मचरित्रातील

आत्मजाणीवा व्यक्तीनिष्ठ स्वरूपाच्या आहेत तसेच त्या सामाजिक स्वरूपाच्या देखील आहेत कारण साहित्यिकाची संवेदना ही व्यक्ती मनाची जरी असली तरी समाजमानाचे वास्तव त्यांच्या साहित्यकृतीतुन व्यक्त केले असते. त्याविषयी डॉ. सुरेश धायगुडे म्हणतात की, "संवेदना, भावना, अनुभव व विचार यांच्यातून साहित्य निर्मिती होत असते, हे सर्व म्हणजे साहित्याची मूळ सामग्री असते व त्यातील अनेकांचा लेखकांनी प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असू शकतो"२. म्हणजेच कोणत्याही भाषेतील साहित्य वरील साधनसामग्रीच्या म्हणजेच संवेदना, भावना, अनुभव व विचार या चर्तुसूत्रीतून साहित्यकृतीचे बांधणे करीत असतात म्हणून आत्मचरित्र या साहित्यप्रकारात आत्मजाणिवा, वास्तवता आणि साहित्यनिष्ठा हे महत्त्वाचे तत्व मानल्याचे दिसून येते.

मराठी साहित्यातील श्रेष्ठ विचारवंत डॉ. निखिल कुमार फडकुले आत्मचरित्रा विषयी म्हणतात की, "आत्मकथन ही केवळ एकट्या 'मी' ची कहाणी नसून ती समाजाची आणि समाजसंबंध अशा अनेक लहान मोठ्या घटनांची कहाणी असते."३. सरांनी मांडलेले आत्मचरित्र विषयी वैचारिक भूमिका मला अत्यंत महत्त्वाचे वाटते कारण , उद्धव भाले यांचे'हेही दिवस जातीलच'हे आत्मचरित्र व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचे असले तरी समाजनिष्ठ स्वरूपाचे आहे , कारण दलित समाजाच्या व्यथा, वेदना, संघर्ष त्यातून अभिव्यक्त झालेला आहे. आपल्या बालपणीतील जाणीवा व्यक्त केले त्याविषयी डॉ. सतीश मस्के म्हणतात की, "आई, वडील, भाऊ, बहीण हे सगळे निरक्षर असतानाही त्यांनी शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही. महापुरुषांच्या विचारांनी त्यांना प्रेरित केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षण घेताना मीनाक्षी कुलकर्णी व जमीला गुलाम मेहमूद यांनी केलेली मदत त्यांचे जीवन घडवण्यास कामी आले". ४. याविषयीच कृतज्ञता त्यांनी व्यक्त केले. आपल्या आत्मजाणीवा गरीब, दुःखद असताना त्यांनी मदत केली. त्याविषयी कृतज्ञ भाव व्यक्त करताना , निरक्षर कुटुंबात जन्म झाला. तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणातून मी आणि संपूर्ण दलित समाज साक्षर झाला हे सामाजिक वास्तव त्यांनी आत्मचरित्रातून अधोरेखित केलेले आहे.

डॉ. उद्धव भाले यांच्या आत्मचरित्रात गरीब परिस्थितीवर मात करण्याची जिद्द आणि अहोरात कष्ट करण्याचे कणखर मनोवृत्ती दिसून येते त्याविषयी डॉ. सतीश मस्के म्हणतात की, "कष्टविना फळ नाही' म्हणल्याप्रमाणे आयुष्यात जिद्द, चिकाटी, मेहनत केल्यानंतर फळ मिळतेच हे स्वकथन वाचल्यानंतर कळते त्यामुळे हे स्वकथन अनेकांना प्रेरणा देणारे आहे." ५.वरील मनातून आत्मचरित्राची भूमिका स्पष्ट होते म्हणून हे आत्मकथन जरी व्यक्तीनिष्ठ असले तरी समाजनिष्ठ स्वरूपाचे आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही.

आपल्या आत्मजाणीवा व्यक्त करताना डॉ. उद्धव भाले म्हणतात की, "आपल्या या स्वकथानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारंवार मोठ्या आदराने उल्लेख करतात. अर्थात ते साहित्यकच आहे. बाबासाहेबांचा प्रेरणा घेऊन लेखक एवढे मोठे यश मिळू शकले. बाबासाहेबांचा या प्रेरणाला तोड नाही त्यांच्या प्रेरणामुळे सर्व कष्ट आणि दुःखे सुसह्य होतात"६.

लेखकांनी मांडलेली भुमिका ही अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण बोधिसत्व , महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणातून दलित समाजाची प्रगती झाली आहे. अंधारामध्ये खिचपत पडलेल्या समाजाला प्रकाशमान करण्याचे अद्वितीय कार्य आंबेडकरांनी केलेले आहे डॉ. उद्धव भाले यानी बालपणांच्या आठवणी व्यक्त करताना म्हणतात की, "मी शाळेत नियमित जायचो त्याचे कारण म्हणजे शाळेत सुखडी मिळत होती , कारण घरामध्ये कायम अन्नाचा तुटवडा आणि त्यामध्ये माझी आणखीन पाच भावंडे."७. लेखकांनी आपले जीवन वास्तव परखडपणे व्यक्त केले आहेत . भाकरीची भुक मागवण्यासाठी ज्ञानाची किंवा ज्ञानसंपदांनी भूक लागली होती. हे वास्तव आपल्या दिसून येते. डॉ. उद्धव भाले यांनी बालपण, माध्यमिक शिक्षण घेताना आलेली अनुभव अत्यंत विदारक वास्तव आणि मन हेलावून टाकणारे आहेत. शाळेतील मधल्या सुट्टी विषयी लिहिता तेव्हा मन सुन्न होते ते म्हणतात की' "ए पोरा! शाळा सुटली की रं! घरी जेवायला गेला नाहीस? मी मग फक्त मान हलवायचो! मी त्यांना कोणतेच उत्तर देत नसे कारण घरी जाऊन तरी काय करायचे घरात अन्नाचा कण नसायचा. बाबा माय दुसऱ्यांच्या शेतात मजुरीसाठी कामाला गेलेले त्यामुळे मी तिथेच बसायचो"८. हे दयनीय व वास्तव जीवन जगत असताना देखील परिस्थितीवर मात करण्याची जिद्द ही अत्यंत महत्त्वाची आहे म्हणून ते आपल्या आत्मचरित्रात 'हेही दिवस जातीलच' हे शीर्षक दिल्याचे दिसून येते

डॉ. उद्धव भाले यांनी 'हेही दिवस जातीलच' या आत्मचरित्रातून बालपणापासून संघर्षमय गाथा अभिव्यक्त केलेली आहे , आर्थिक गरिबापेक्षा ज्ञानात्मक श्रीमंत सर्वश्रेष्ठ आहे. या जीवनजाणीवातून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणातून मानवी जीवनाचा उद्धार होऊ शकतो. हे सामाजिक वास्तव त्यांच्या आत्मचरित्रातून स्पष्ट होते. म्हणून ही आत्मचरित्र दलित समाजातील तरुण पिढीला प्रेरणादायी आहेच . त्याचबरोबर भारतीय समाज व्यवस्थेत जो शिक्षणापासून वंचित उपेक्षित आहे , तो तरुण कोणताही जाती धर्मातील असो त्यांच्यासाठी 'हे ही दिवस जातीलच' ! हे नक्कीच .....

## संदर्भ यादी

1. डॉ. सुरेश धायगुडे : पाश्चिमात्त्य साहित्यशास्त्र सिद्धांत व संकल्पना
निर्भय प्रकाशन पुणे १९९० (पान नं. -११०)
2. -----------तत्रेव --------- (पान नं. १८९ )
3. डॉ. निर्मलकुमार फडकुले : अस्मितादर्श (दिवाळी अंक) औरंगाबाद वर्ष - २९ अंक ०३ (पान नं. ४५)
4. डॉ. सतीश मस्के : दैनिक सकाळ वृत्तपत्र १९/११/२०२० (दैनिक) प्रेरणादायी आत्मचरित्र हेही दिवस जातीलच(पान नं.-८ )
5. ------------ तत्रेव------------- (पान नं.-८)
6. विलास वाघ - हे ही दिवस जातीलच(प्रस्तावना)(पान नं.-३)
7. डॉ. उद्धव भाले - हे ही दिवस जातीलच - सुगाव प्रकाशन पुणे २००९ (पान नं.-२ )
8. ------------ तत्रेव ------------- (पान नं.-3)